<u>पाणलोट विकास चळवळ, सन २०१२-१३ करीता</u>
<u>निधी वितरित करण्याबाबत</u>

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय, क्र.पाविच-२०१२/प्र.क्र.६२/जल-८
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ मे , २०१२

वाचा :

१) शासन निर्णय नियोजन विभाग क्र. रोहयो-२००७/ प्र. क्र.१४३/रोहयो-१, दि.१४ ऑगस्ट, २००७.
२) शासन परिपत्र वित्त विभाग क्र. बीजीटी-२०१२/प्र.क्र.५५/ अर्थसंकल्प-३ दिनांक ३१ मार्च २०१२

<u>शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र</u>

३) जलसं २००८/प्र.क्र.३१/जल-८, दि.२५ ऑगस्ट, २००८.
४) असक २०११/प्र.क्र.११ /जल-११, दि. १९एप्रिल, २०१२.

५) संचालक, मृदसंधारण व पाणलोट व्यवस्थापन पुणे यांचे पत्र क्रं. मृदस/पाणविका १२-१३/१२५४/१२ दिनांक १६ मे, २०१२.

<u>प्रस्तावना</u> :

राज्यातील बहुतांशी क्षेत्र कोरडवाहू असून उपलब्ध जलस्त्रोताचा उपयोग केला तरी देखील ७० टक्के पेक्षा जास्त क्षेत्र कायम स्वरुपी नैसर्गिकरित्या पडणा-या पावसावरच अवलंबून रहाणार आहे. हे लक्षात घेऊन पाणलोट क्षेत्रविकासाचा कार्यक्रम गेल्या अनेक वर्षापासून राज्यात सुरु असून, सुरु केलेले पाणलोट मोठया प्रमाणावर अपूर्ण आहेत. हे पाणलोट गतीमान पध्दतीने विकसित करण्याचा धडक कार्यक्रम देखील शासनाने हाती घेतला आहे. महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान प्रामुख्याने लोकसहभागातून राबविणे राज्यात गेली काही वर्षे सुरु आहे. या व्यतिरिक्त महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत देखील जलसंधारणाच्या कामास फार मोठे महत्व आहे. मृद व जलसंधारण, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, त्या अनुषंगाने संबंधित कार्यक्रमाची जनजागृती मोहिम राबविण्यासाठी नियोजन विभागाच्या उक्त दिनांक १४ ऑगस्ट, २००८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. हे सर्व प्रयत्न होत असले तरी देखील राज्यांतील पाणलोट विकासाकरीता उपलब्ध असलेल्या क्षेत्राची व्याप्ती फार मोठी आहे. मृद व जलसंवर्धनाचे उद्दिष्ट व महत्व सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी जलसंधारणाकरीता पाणलोट विकास चळवळ कार्यक्रम राबविण्याचा निर्णय शासनाने संदर्भाधीन २ येथील दिनांक २५ ऑगस्ट २००८ च्या शासन निर्णयाव्दारे घेतला. या कार्यक्रमाची अंमलबजावणी सन २००८ ते २०११ मध्ये करण्यात आली आहे. सन २०१२-१३ मध्ये पाणलोट विकास चळवळ कार्यक्रम राबविण्यासाठी जाहिरात व प्रसिध्दी या बाबीसाठी रु. १००.०० लाख व बक्षिसे या बाबीसाठी रु. २५०.०० लाख असा एकूण रु. ३५०.०० लाख निधी अर्थसंकल्पीत झाला आहे. त्यापैकी रु १००.०० लख निधी वितरित करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक मृदसंधारण यांच्या वर नमूद दिनांक १६ मे, २०१२ च्या पत्राने प्राप्त झाला आहे. त्यानुसार सदर निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

...२

शासन निर्णय :

राज्यातील पाण्याची उपलब्धता व वारंवार येणारी दुष्काळ सदृष्य परिस्थिती विचारात घेता जलसंवर्धनाच्या कार्यक्रमास अनन्य साधारण महत्व आहे. राज्यातील पडीक जमीन विकास, पाण्याच्या उपलब्धतेकरिता पाणलोट विकासावर आधारित जलसंधारणाचे महत्व लक्षात घेवून पाणलोट विकासाचा कार्यक्रम राज्यातील विविध राज्य पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून राबविण्यात येतो. राज्यात राबविण्यात येणा-या पाणलोट विकास कार्यक्रमाच्या प्रत्येक टप्प्यात लोकसहभाग घेणे, पाणलोटाच्या निरनिराळ्या कामांची देखभाल करणे, उपलब्ध होणा-या पाण्याचा काटकसरीने वापर करुन जास्तीत जास्त उत्पादन मिळविणे यासाठी जलसंधारण कार्यक्रम पाणलोट विकास चळवळ म्हणून राबविण्यात येतो. या चळवळीचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

(१) पाणलोट विकास कार्यक्रमांना विविध प्रसिध्दी माध्यमातून प्रसिध्दी देणे
(२) ग्रामीण भागातील जनतेमध्ये जल, भूमी व इतर नैसर्गिक साधन संपत्ती संवर्धनाबाबत आस्था निर्माण करणे.
(३) जलसंधारण कामांना अधिक गती देणे.
(४) पाणलोट विकासाच्या विविध टप्प्यामध्ये जनजागृतीद्वारे लोकसहभाग घेणे
(५) पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत निर्माण केलेल्या विविध स्त्रोतांचे जतन करण्यासाठी लोकजागृती निर्माण करणे.
(६) उपलब्ध भुपृष्ठावरील व भूगर्भातील पाण्याच्या काटकसरीने वापर करून उत्पन्न व उत्पादन वाढविण्यास शेतक-यांना प्रवृत्त करणे.

वरील उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांनी जाहिरात व प्रसिध्दी या बाबी अंतर्गत वर नमूद दिनांक १६ मे, २०१२ च्या पत्रान्वये प्रस्तावित केलेल्या आणि सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये नमूद केलेल्या कार्यक्रमास सन २०१२-१३ मध्ये राबविण्यास मंजुरी देण्यात येत आहे. सदर निधी खर्च करण्यासाठी आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिनस्त ठेवण्यात येत आहे. त्यांनी सदर निधीचे वाटप संबंधितांना करावे. सदर निधी संगणक वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. आयुक्त, कृषी यांनी प्रपत्र-अ मध्ये नमूद कार्यक्रम त्यापुढे दर्शविलेल्या बाबनिहाय रक्कमेच्या मर्यादेत राबवावा. त्यांनी सदर निधी खर्च करण्यासाठी आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात.

४. हा निधी खर्च करण्यासाठी आयुक्त, कृषी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतचा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

लेखाशिर्ष,
"मागणी क्रमांक एल-७, ४४०२- मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च -
१०२ - मृदसंधारण -
(०१) राज्य योजना पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
(०१) (२१) पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, प्रसिध्दी व पारितोषिक योजना (४४०२ २३५१)
२६, जाहिरात व प्रसिध्दी "

५. वितरीत केलेला निधी मंजूर केलेल्या बाबींवर खर्च होईल याची दक्षता घेण्यात यावी. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास नियमितपणे सादर करण्यात यावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक बीजीटी-२०१२/प्र.क्र.५५/ अर्थसंकल्प-३ दिनांक ३१ मार्च २०१२ अन्वये प्रशासकिय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

...३

७. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०५२८१५०६०८५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुनील चव्हाण)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय
आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व संचालक, कृषी आयुक्तालय,
सर्व विभागीय कृषी सहसंचालक,
सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,
महालेखापाल-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई .
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व
नियोजन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग
(जलसंधारण उप विभाग),मंत्रालय,मुंबई.
कार्यासन अधिकारी (जल-११/ जल-१९) ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई.
जल-८(निवडनस्ती),ग्रा.वि.वज.सं.विभाग,मंत्रालय,मुंबई.

शासन निर्णय क्र. पाविच २०१२/ प्र.क्र.६२/ जल ८ दिनांक २८ मे २०१२ चे प्रपत्र ' अ '

(रु. लाखात)

अ.क्र	बाब	तपशिल	मंजूर निधी
१	मुद्रण प्रसारणाद्वारे प्रसिध्दी	१.१ वृत्तपत्रामधून पाणलोट विषयक जाहिरात प्रसिध्दी करीता जाहिरात निर्मिती, जहिरातीचे आर्टवर्क करणे, अनुषंगिक बाबी व जाहिरात प्रसिध्द करणे	१०
		१.२ यशोगाथा तयार करणे कृषी विभागाच्या शेतकरी मासिकामध्ये पाणलोट विषयक माहिती व जाहिरात प्रसिध्द करणे	५
२	इलेक्ट्रॉनिक्स मिडियाद्वारे प्रसिध्दी	२.१ पाणलोट विषयक ऑडिओ जिंगल्स/ स्पॉट निर्मिती व आकाशवाणीवरुन प्रसारण करणे	१५
		२.२ पाणलोट विषयक ऑडिओ जिंगल्स/ स्पॉट निर्मिती व दुरदर्शनाव्दारे प्रक्षेपण करणे. खाजगी वाहिनीवरुन स्क्रोलचे प्रक्षेपण करणे	१०
		२.३ महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने अधिकृत केलेल्या परवानाधारकामार्फत यांचेमार्फत एस.टी बसस्थानकावरुन संगणकीय उद्घोषण दरम्यान पाणलोट विषयक ऑडिओ जिंगल्स/स्पॉटचे प्रसारण करणे	४४
३	जनजागृती कार्यक्रम	राष्ट्रीय वृत्तपत्रे, संस्था यांचे स्बत प्रायोजक स्वीकारुन विभाग/ जिल्हास्तरावर शालेय विद्यार्थ्यांच्या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करणे, व बक्षिसांची रक्कम अदा करणे	९
४	कार्यशाळेचे आयोजन करणे	राज्यस्तरावर व विभागस्तरावर पाणलोट विषयक कार्यशाळांचे आयोजन करणे	७
		एकूण	१००